LOKMAT
[MARATHI DAILY]
PUNE
JUNE 6, 2013

# कायद्याला प्रदूषण पर्यावरणाचा विचार आवश्यक प्रतिबंधही अभिप्रेत

## दिलीप बोराळकर : पुरस्काराचे वितरण

पुणे : कायद्यानुसार प्रदूषण होऊ नये यासाठी प्रतिबंधक उपाय करणेसुद्धा आवश्यक असताना आपण केवळ प्रदूषण नियंत्रण करीत आहोत, असे सांगतानाच पर्यावरणाचे राजकारण करू नये अन्यथा ‑लोकांचा पर्यावरणावरचा विश्वास उडेल, असे केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे माजी सदस्य दिलीप बोराळकर यांनी आज येथे सांगितले.

'एन्व्हायरमेंटल क्लब ऑफ इंडिया' आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे एकेचाळीसाव्या पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरणवादी कार्यकर्ते विश्वंभर चौधरी यांना पर्यावरणभूषण पारितोषिकाने बोराळकर यांच्या हस्ते गौरविण्यात आले. 'एन्व्हायरमेंटल क्लब'चे अध्यक्ष विश्वास मुंडे, पदाधिकारी डी. टी. देवळे, तसेच किरण कुलकर्णी, मुकुंद परदेशी व्यासपीठावर होते. पर्यावरणविषयक कामगिरी करणाऱ्या ॲमनोरा पार्क टाऊनसिटी, विषय कंपोनंट्स, क्लिन गार्बेज मॅनेजमेंट, जॉन डिअर कंपनी, ॲटलास कॉप्को, गोदरेज बॉईज, बिल्ट ग्राफिक्स या संस्थांनाही स्मृतिचिन्ह व प्रशस्तिपत्राने गौरविण्यात आले.

'पुनर्चक्र' या पुस्तिकेचे प्रकाशन या वेळी झाले. तसेच, हवेतील प्रदूषणाविषयीचे गंभीर परिणाम विषद करणारा लघुपटही प्रदर्शित करण्यात आला.

भोपाळ दुर्घटनेला सव्वीस वर्षे उलटली. यामध्ये बळी पडलेल्यांना साधे स्वच्छ पाणी देऊ शकलेलो नाही, अशी टीका करून बोराळकर यांनी पर्यावरणविषयक संशोधनामध्ये विद्यापीठांची कामगिरी शून्य असल्याचे नमूद केले. पर्यावरणविषयक आवश्यक ज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य आपल्या देशात आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळांतर्गत समित्याही अद्याप स्थापन झालेल्या नाहीत, असे सांगून बोराळकर यांनी आजच्या पर्यावरण दिनाच्या दिवशी प्रदूषणाविषयक प्रतिबंधक उपायांची मागणी पुढे आणली गेली पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

'बिल्ट ग्राफिक्स'चे ललित राठी यांनी मनोमत व्यक्त केले. मुंडे यांनी प्रास्तविक केले. देवळे यांचेही भाषण झाले. स्वाती महाळंक यांनी सूत्रसंचालन केले. (प्रतिनिधी)

### कॉर्पोरेट क्षेत्राला देश आंदण

चौधरी यांनी मनोगत व्यक्त करताना सिमेंट कॉंक्रीट म्हणजे विकास ही कल्पना आपण केव्हा सोडणार आहोत, अशी अपेक्षा व्यक्त केली. शासन म्हणजे नफा कमाविणारी संस्था झाली आहे. कॉर्पोरेट क्षेत्राला हा देश आंदण देण्यात आला आणि कॉर्पोरेट क्षेत्राकडील लँडबँक हा देशापुढील सर्वांत मोठा धोका आहे, असे सांगून पर्यावरणवादी कार्यकर्त्यांचा विकृत विकासाला विरोधच असेल. आपण थांबून कोठे चाललो आहोत, याचे सिंहावलोकन करून थांबून थांबून विकास झाला पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.




**पुरस्कार वितरण...** पर्यावरण दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात (डावीकडून) विश्वास मुंडे, दिलीप बोराळकर, विश्वंभर चौधरी, डी. टी. देवळे.